# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
# नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १४ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ३५** **विषय क्रमांक - ३५**

दिनांक : १८/०७/२०२४ विभाग : सार्वजनिक बांधकाम विभाग.:

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ३५<br>दिनांक<br>१८/०७/२०२४ | ई निविदा क्रमांक १४८३ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर भागातील रस्त्याचे पॅचिंग करणे<br>संदर्भ - कमर्सिअल सुट क्रमांक ४/२०२२ |
| ठराव क्रमांक - ३५<br>दिनांक<br>१८/०७/२०२४ | बांधकाम विभागाने प्रस्तावित केल्या नुसार विषयांकित कामांचा कार्यारंभ आदेश दिनांक ३१-८-२०१७ रोजी देण्यात आला होता. व कामाची मुदत ८ महिने इतकी असल्याने दिनांक ३०-४-२०१८ पर्यत काम पूर्ण करणे अपेक्षित होते. तथापी तीन महिने मुदतवाढ घेवून प्रथम मुदतवाढ तत्कालीन शहर अभियंता यांनी मान्यता दिलेली होती. तथापी विविध कारणांमुळे व सदरची निविदा ही पॅचिंग कामाची असल्याने दि. ३१-१२-२०१८ अखेर पूर्ण केलेल्या कामाचे तथापी देयक मंजूरीसाठी सादर करते वेळी असलेल्या दिनांका पर्यत मुदतवाढ घेतल्या शिवाय लेखापरिक्षण करणार नसल्याने या कारणास्तव सन २०१८ मध्ये प्रस्तावित केलेल्या मुदतवाढीच्या प्रस्तावावर विविध विभागाचे अभिप्रायाअंती मा.आयुक्त यांनी दिनांक ३०-६-२०२१ रोजी मुदतवाढ मान्य करण्यात आली. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता प्रकरण १० कलम ६८ नुसार मुदतबाहय मागण्यामध्ये मुदतीच्या संबंधीच्या कायदयाच्या कोणत्याही तरतूदीमध्ये मुदत उलटून गेलेल्या नगरपरिषदेकडील सर्व मागण्या या सामान्यपणे नाकारण्यात येतील अशी कोणतीही मागणी नगरपरिषदेने दाव्याच्या गुणवत्तेचा विचार केल्याशिवाय व नगरपरिषदेच्या संमत्ती शिवाय देता येणार नाही अशी तदतूद आहे. त्यानुसार कायदयाच्या तरतुदीनुसार प्रथम मुदत दि. ३१-७-२०१८ पर्यत सक्षम प्राधीकरणाची व काम पूर्ण झाल्याच्या दिनांका पर्यत म्हणजे दि. ३१-१२-२०१८ पयर्त सक्षम प्राधीकरणाची मुदतवाढ प्राप्त करून तदनंतर देयक प्रस्तावित केलेले आहे. तसेच गुणवत्तेबाबत वेळोवेळी सक्षम प्राधीकरणाचे टेस्ट रिपोर्ट घेतलेले असून सदरच्या पॅचिंगच्या कामाचे ठेकेदाराने देयक मिळणे बाबत मागणी केलेली आहे. |

| | |
|---|---|
| | तरी सदर प्रस्तावा बाबत उपायुक्त यांनी दिलेल्या शेरांकनानुसार बांधकाम विभागाने पुढील योग्य ती कार्यवाही करणेस मा.प्रशासकीय सर्वसाधारण सभा यांस मंजूरी देत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.ागरसचिव
अहमदागर महाागरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदागर महाागरपालिका.

| | |
|---|---|
| | **अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**<br>**नगरसचिव विभाग** |

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १४ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ३६**
**दिनांक** : १८/०७/२०२४

**विषय क्रमांक - ३६**
**विभाग** : प्रसिध्दी विभाग.:

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ३६<br>दिनांक १८/०७/२०२४ | सबा व्हिडीओ शुटींग व फोटोग्राफी यांची व्हिडीओ चित्रीकरणाचे बील अदा करणे बाबत |
| ठराव क्रमांक - ३६<br>दिनांक १८/०७/२०२४ | महानगरपालिका अधिकृत टेंडर धारक सबा व्हिडीओ शुटींग व फोटोग्राफी प्रोप्रा. शब्बीर सय्यद यांनी अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध कार्यक्रमाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आलेले आहे. रक्कम रूपये ७००/- प्रति २४ या दराने प्रसिध्दी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार ५६,०००/- (रूपये छप्पन हजार ) देयकास एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने सदर देयक अदा करण्यास मा.प्रशासकीय सर्वसाधारण सभा यांस मंजूरी देत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.ागरसचिव
अहमदागर महाागरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदागर महाागरपालिका.

| | |
|---|---|
| | **अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**<br>**नगरसचिव विभाग** |

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १४ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ३७** **विषय क्रमांक - ३७**

**दिनांक** : १८/०७/२०२४ **विभाग** : आरोग्य विभाग.:

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ३७<br>दिनांक १८/०७/२०२४ | सरकार सर्व्हीस या संस्थेचे अनामत रक्कम देणे बाबत |
| ठराव क्रमांक - ३७<br>दिनांक १८/०७/२०२४ | ठेकेदार संस्था सरकार सर्व्हीस यांना आरोग्य जा.क्र. १३७० दि.३०-११-२०१९ ने बेवारस प्रेत दफनविधी करणे करिता कार्यारंभ आदेश दिला. सदर संस्थेला अनामत रक्कमेस तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने सदर देयक अदा करणेस सर्व साधारण सभेची मंजूरी आवश्यक आहे.<br>तरी सरकार सर्व्हीस या संस्थेची अनामत रक्कम अदा करणेस मा.प्रशासकीय सर्वसाधारण सभा यांस मंजूरी देत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.ागरसचिव
अहमदागर महाागरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदागर महाागरपालिका.

| | |
|---|---|
| | # अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर<br>## नगरसचिव विभाग |

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १४ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ३८** **विषय क्रमांक - ३८**
**दिनांक** : १८/०७/२०२४ **विभाग** : स्टोअर विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ३८<br>दिनांक १८/०७/२०२४ | निविदा सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम निविदाकार यांना परत करणेस मंजूरी मिळणे बाबत |
| ठराव क्रमांक - ३८<br>दिनांक १८/०७/२०२४ | अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेश पात्र पुरूष कर्मचारी यांचे कार्यालयीन गणवेश शिलाई बाबतची निविदा निविदाकार पतंगे सुपरस्टीच टेलर्स शॉप नं. १३, तुळजाभवानी मंदिरा समोर, पाईप लाईन रोड , अहमदनगर यांचे सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम रूपये २४,०००/- अदा करण्यास तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने सदरची रक्कम अदा करणेस मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक आहे.<br>तरी पतंगे सुपरस्टीच टेलर्स , अहमदनगर यांनी भरलेली सिक्युरिटी डिपॉझिट अदा करणेस मा.प्रशासकीय सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.ागरसचिव
अहमदागर महाागरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदागर महाागरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १४** **विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ३९**
**दिनांक** : १८/०७/२०२४

**विषय क्रमांक - ३९**
**विभाग** : कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ३९<br>दिनांक १८/०७/२०२४ | कै.बा.दे.दवाखाना येथे जननी सुरक्षा कार्यक्रम या योजने अंतर्गत मोफत आहार योजनेचे प्रलंबित देयके महिला व बाल कल्याण समिती जननी शिशु सुरक्षा योजना या लेखाशिर्षामधून अदा करणे बाबत |
| ठराव क्रमांक - ३९<br>दिनांक १८/०७/२०२४ | कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे जननी शिशु सुरक्षा योजना अंतर्गत मोफत आहार योजने करिता आहार पुरविणेच्या कामाचा ठेका क्रांती विकास महिला मंडळ यांना देण्यात आलेला होता. सदर संस्थेने दि. १ एप्रिल २०१६ रोजी देयक मिळणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. कागदपत्रांची पडताळणी केली असता सदर संस्थेने दिनांक २८-१०-२०२० रोजी उशिराने अर्ज केल्याचे निदर्शनास येते सदर अर्जा नुसार कार्यवाही होण्यास विलंब झाल्याने संबंधीत लिपीक यांचेवर दप्तर दिरंगाई बाबत चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. क्रांती विकास महिला मंडळ, अहमदनगर यांचे माहे एप्रिल २०१६ चे देयक रक्कम रूपये ९१,६८५/- हे ७ वर्षापूर्वी चे असल्याने सदर देयक अदा करण्यास मा.प्रशासकीय महासभेची मंजूरी आवश्यक आहे.<br>तरी क्रांती विकास महिला मंडळ , अहमदनगर यांचे देयक अदा करण्यास मा.प्रशासकीय सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.ागरसचिव
अहमदागर महाागरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदागर महाागरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
# नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १४** **विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ४०** **विषय क्रमांक - ४०**
**दिनांक** : १८/०७/२०२४ **विभाग** : बांधकाम विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ४०<br>दिनांक १८/०७/२०२४ | सौ.वाजेदा जब्बार मैदर्गी म्यु.पल घर नं. ५२९६ ते ५३०१ सि.स.नं. २५७२/१ बुरूडगल्ली येथील मिळकतीचा धोकादायक भाग उतरवून घेणे खर्चा पोटी सामान्य पावती क्रमांक ९४३२५ अन्वये रक्कम रूपये ८,०००/- दि. १४-११-२००६ रोजी भरलेली रक्कम परत मिळणे बाबत |
| ठराव क्रमांक - ४०<br>दिनांक १८/०७/२०२४ | सौ.वाजेदा जब्बार मैदर्गी यांनी बुरूडगल्ली येथील मिळकतीचा धोकादायक भाग उतरवून घेणे कामी भरलेली रक्कम परत मिळणे बाबत मागणी केलेली आहे. सदर धोकादायक भाग उतरवून घेणेबाबत रक्कम रू. ८,०००/- दिनांक १४-१-२००६ रोजी भरलेली असून त्यास किमान १८ वर्षाचा कालावधी उलटून गेलेला आहे. त्यामुळे सदरची व्यापगत झालेली रक्कम अदा करणेस मा.प्रशासक सर्व साधारण सभेची मंजूरी आवश्यक आहे.<br>तरी सौ.वाजेदा जब्बार मैदर्गी यांनी भरलेली रक्कम रू ८,०००/- अदा करण्यास मा.प्रशासकीय सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.ागरसचिव
अहमदागर महाागरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदागर महाागरपालिका.

| | |
|---|---|
| | **अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**<br>**नगरसचिव विभाग** |

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १४** **विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ४१** **विषय क्रमांक - ४१**
**दिनांक** : १८/०७/२०२४ **विभाग** : आस्थापना विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ४१<br>दिनांक १८/०७/२०२४ | श्री श्रीनिवास कुरे तत्कालीन उपायुक्त यांनी सादर केलेले त्यांच्या वडीलांचे वैदयकिय खर्चाचे देयक अदाई बाबत |
| ठराव क्रमांक - ४१<br>दिनांक १८/०७/२०२४ | अहमदनगर महानगरपालिकेमधील श्री श्रीनिवास कुरे तत्कालीन उपायुक्त यांनी त्यांचे वडील श्री गंगाधर परबतराव कुरे यांचे वैद्यकिय खर्चाचे प्रतिपुर्तीचे देयक रक्कम रूपये ३,४९,८६८/- इतके असून सदर देयक अदा करण्यास प्रशासकीय मान्यता असून सदर देयक अदा करण्यास मा.प्रशासक सर्व साधारण सभेची मंजूरी आवश्यक आहे.<br>तरी श्री श्रीनिवास कुरे तत्कालीन उपायुक्त यांचे वडीलांचे वैद्यकिय खर्चाचे देयक अदा करण्यास मा.प्रशासकीय सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.ागरसचिव
अहमदागर महाागरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदागर महाागरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १४** **विषयाबाबतचे निर्णय.**
**मा.प्रशासक ठराव क्रं. ४२** **विषय क्रमांक - ४२**
**दिनांक** : १८/०७/२०२४ **विभाग** : लेखा विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ४२<br>दिनांक १८/०७/२०२४ | महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा मधील कर्मचा-यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनातील नियम लागू करणे बाबत |
| ठराव क्रमांक - ४२<br>दिनांक १८/०७/२०२४ | अहमदनगर महानगरपालिकेत दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत रूजू झालेल्या कर्मचा-यांच्या महा.शासन वित्त विभाग शा.नि.क्र. अंतियो १००/१२६/सेवा-४ मंत्रालय , मुंबई दि. ३१ ऑक्टोबर २००५ च्या परिपत्रका नुसार त्यांच्या वेतनातून मुळ वेतन व महागाई भत्ता या रकमेचा १० टक्के रक्कम कपात करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शा.नि.क्र. अंतियो - २०१९/ २६६/सेवा-४ मंत्रालय , मुंबई दि. १९ ऑगस्ट २०१९ च्या परिपत्रका नुसार कर्मचा-यांच्या मुळ वेतन अधिक महागाई भत्ता एकूण रक्कमेच्या १४ टक्के रक्कम महानगरपालिकेचा हिस्सा त्यांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे.<br>शासन निर्णयानुसार अहमदनगर महानगरपालिकेतील दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत रूजू झालेल्या कर्मचा-यांना मा. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक :रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४ दि. ३१ मार्च २०२३ चे परिपत्रकानुसार शासन निर्णयाच्या दिनांकापासून ज्या कर्मचा-यांनी विकल्प दिलेल्या आहे अशा कर्मचा-यांना त्यांच्या विकल्पानुसार आर्थिक लाभ देण्याबाबतचा प्रस्ताव लेखा विभागाने सादर केला परंतु सदर योजने बाबत मा.शासनाने अजून काही शासन निर्णय दिलेले आहेत यासह सविस्तर एकत्रित सुधारित प्रस्ताव मा.प्रशासकीय महासभेपुढे फेर सादर करण्यात यावा. यास मा.प्रशासकीय सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.ागरसचिव
अहमदागर महाागरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदागर महाागरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १४** **विषयाबाबतचे निर्णय.**
**मा.प्रशासक ठराव क्रं. ४३** **विषय क्रमांक - ४३**
**दिनांक** : १८/०७/२०२४ **विभाग** : सामान्य प्रशासन विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ४३<br>दिनांक १८/०७/२०२४ | रसिक ग्रुप ,अहमदनगर संस्थेस गुढीपाडवा सांस्कृतिक महोत्सव रसिकोत्सव -२४ साठी अहमदनगर महानगरपालिकेचे प्रमुख प्रायोजकासाठीचे अनुदान अदा करणे बाबत |
| ठराव क्रमांक - ४३<br>दिनांक १८/०७/२०२४ | श्री जयंत येलूलकर, रसिक ग्रुप, अहमदनगर यांनी पत्र देवून अहमदनगर येथे सध्या ३० वर्षा पासून सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यटन क्षेत्रात कार्य करणा-या रसिक ग्रुपच्या वतीने २२ वा गुढीपाडवा सांस्कृतिक महोत्सव हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा सांस्कृतिक सोहळा पार पडला या सोहळयास आपले कायम मोठे सहकार्य असते यावर्षी देखील आपण प्रमुख प्रायोजक या नात्याने आर्थिक सहकार्य मिळेल यामुळेच हा सांस्कृतिक सोहळा यशस्वी होवू शकला व जवळ जवळ ३० हजार नगरकर रसिक याचा आनंद घेवू शकले. कृपया रक्कम रू. १० लाख अनुदान लवकरात लवकर मिळावे असे कळविले. अर्जदार यांनी संदर्भिय पत्रा समवेत निमंत्रण पत्रिका तीन वर्षाचे ऑडीट, संस्थेचे प्रमाणपत्र, कर सवलत प्रमाणपत्र इ. जोडले आहे.<br>रसिक ग्रुप अहमदनगर यांनी गुढीपाडवा उत्सवा करिता अनुदानाची मागणी केली सदर बाब धोरणात्मक असल्याने मा.प्रशासक सर्व साधारण सभेची मंजूरी आवश्यक आहे.<br>तरी रसिक ग्रुप, अहमदनगर या संस्थेस रक्कम रूपये ५ लाख अनुदान अदा करण्यास मा.प्रशासकीय सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.ागरसचिव
अहमदागर महाागरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदागर महाागरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १४** **विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ४४** **विषय क्रमांक - ४४**
**दिनांक** : १८/०७/२०२४ **विभाग** : पाणी पुरवठा विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ४४<br>दिनांक १८/०७/२०२४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनेसह भुयारी गटर योजना हस्तांतरणा वेळी महानगरपालिकेकडे ( तत्कालीन नगरपरिषदेकडे ) वर्ग केलेल्या जागां बाबतचा अहवाल मा.महासभेसमोर सादर करणे बाबत |
| ठराव क्रमांक - ४४<br>दिनांक १८/०७/२०२४ | विषयांकित बाबत पाणी पुरवठा विभागाने सादर केलेल्या प्रस्तावात सविस्तर माहिती देण्यात आलेली नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे कोणकोणते क्षेत्र आहेत सदर क्षेत्रापैकी कोणत्या क्षेत्राची खरेदी झालेली आहे, कोणत्या क्षेत्राचे हस्तांतरण झालेले आहे तसेच कोणत्या क्षेत्राचे हस्तांतरण होणे बाकी आहे याबाबत सविस्तर अहवाल प्रस्तावित करणे आवश्यक आहे<br>प्रस्तावात नमुद पाच ठिकाणाच्या किती क्षेत्र आहे याबाबत सविस्तर माहितीसह अहवाल<br>सन १९९९ अहमदनगर पाणी पुरवठा योजना टप्पा ३ भाग १ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ , अहमदनगर यांचेकडून तत्कालीन अहमदनगर नगरपारिषदेकडे हस्तांतरीत करते वेळी योजना हस्तांतरीत करताना योजनेसाठी खरेदी करण्यात आलेले तसेच बांधण्यात आलेली सर्व प्रकारची मालमत्ता नगरपरिषदेच्या नांवे करण्यात यावी असे उभयतांनमध्ये ठरले होते याबाबत करारनामा किंवा लेखी पत्र व्यवहार झाला असेल तर त्याबाबचा अहवाल<br>विळद व वसंतटेकडी येथील संपूर्ण क्षेत्र महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात यावे याबाबतचा पत्रव्यवहार झालेला आहे. परंतु त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नकार दिलेला आहे. याबाबत विभागाने काय कार्यवाही केली.<br>अहमदनगर शहर भुयारी गटर योजना टप्पा १ व २ ही साधारणता १९९० च्या आसपास राबविण्यात आलेली आहे. या योजने अंतर्गत ही बुरूडगांव रोड परिसरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत जागा खरेदी झालेल्या आहेत. त्यातील काही जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या आहेत. त्यात काही जागा हस्तांतरीत होणे |

| | |
|---|---|
| | बाकी आहे. असे प्रस्तावात नमुद आहे. याबाबत कोणकोणत्या जागा व किती क्षेत्र आहे याबाबत सविस्तर अहवाल तयार करून मा.प्रशासक सर्व साधारण सभे समोर फेर सादर करण्यात यावा. यास मा.प्रशासकीय सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.ागरसचिव
अहमदागर महाागरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदागर महाागरपालिका.